प - 19

# बृहन्मुंबई महानगरपालिका

कवसं /1929 / एमसी / 625/सांख्यिकी/२०२०-२१

दि - 29-01-2021

**परिपत्रक**

**विषय** - महाराष्ट्र शासनाच्या अधिनियमानुसार 46.45 चौ.मी. (500 चौ.फू.) पर्यतच्या निवासी इमारती / गाळे / सदनिका यांना मालमत्ता कर सवलत देणेबाबत.

**संदर्भ**– 1) महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र. 11 दि. 10 मार्च 2019.
2) महाराष्ट्र शासन अधिनियम क्र. 24 दि. 23 जुलै 2019.

उपरोक्त संदर्भित अध्यादेश व अधिनियमाबाबत करदात्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाल्याने खालीलप्रमाणे खुलासावजा परिपत्रक जारी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र. 11 दि. 10 मार्च 2019 व महाराष्ट्र शासन अधिनियम क्र. 24 दि. 23 जुलै 2019 अन्वये महानगरपालिका अधिनियम,1888 च्या कलम 140 मधील पोट-कलम (1) च्या खंड (क) मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सदर सुधारणेनुसार , 46.45 चौ.मी. (500 चौ.फूट) किंवा त्याहून कमी चटई क्षेत्र असलेल्या निवासी इमारती किंवा निवासी गाळे यांवर मालमत्ता करातील बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 च्या कलम 140 च्या पोट – कलम (1) खंड (क) अन्वये आकारण्यात येणारा सर्वसाधारण कर दिनांक 10.03.2019 पासून आकारण्यात येणार नाही.

**करनिर्धारक व संकलक**

**सह. आयुक्त (क. व सं.)**

Scanned by CamScanner